आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२१ एप्रिल २०२४ - रविवार

भगवान महावीर जयंतीनिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रम होत आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना महावीर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीच्या भारत मंडपम मध्ये २ हजार ५५० व्या भगवान महावीर निर्वाण महोत्सवाचं उद्घघाटन झालं. यावेळी प्रधानमंत्र्यांनी एक विशेष टपाल तिकिट आणि  नाण्याचं प्रकाशन केलं. आपल्या भाषणात मोदी म्हणाले की, भारत ही सर्वात प्राचीन संस्कृतीच नाही, तर मानवतेचा सर्वात सुरक्षित स्वर्ग आहे.

भगवान महावीर जयंतीनिमित्त मुंबईतल्या ठिकठिकाणच्या जैन मंदिरांमध्ये आज विविध अध्यात्मिक कार्यक्रम सुरु आहेत. महावीर जयंती निमित्त आज पालघर जिल्ह्यातल्या बोईसर तसंच  पालघर शहरात भव्य शोभा यात्रा काढण्यात आल्या होत्या. या यात्रेत महिला आणि  पुरुषांसह लहान मुलंही मोठ्या प्रमाणात सहभागी झाली होती. जिल्ह्यातल्या इतर भागातही महावीर जयंती उत्साहात साजरी होत आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीसाठीच्या तिसऱ्या टप्प्यात उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया काल पार पडली. या तिसऱ्या टप्प्यात दहा राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमधल्या ९४ मतदारसंघांमध्ये येत्या सात मे रोजी मतदान होणार आहे. या टप्प्यात उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत उद्यापर्यंत आहे. महाराष्ट्रात रायगड, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, बारामती, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, कोल्हापूर आणि हातकणंगले या ११ मतदार संघांचा या टप्प्यात समावेश आहे.

<><><><><>

**सोलापूर** मतदारसंघात ३२ उमेदवारांनी ४३ उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ३३अर्ज वैध ठरले आहेत. माढा लोकसभा निवडणुकीसाठी सातारा जिल्ह्यातील माण आणि फलटण तालुक्यातून ९ जणांचे उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

**सांगली** मतदारसंघात ४४ अर्ज प्राप्त झाले होते. त्यातले २५ अर्ज वैध ठरले.

<><><><><>

पहिल्या टप्प्यातील मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाल्यामुळे पुढच्या टप्प्यांमध्ये प्रचाराला वेग आला आहे. सत्तारुढ आणि विरोधी आघाडीतले उमेदवार देशभरात प्रचारसभा घेत आहेत. प्रधानमंत्री आणि भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रात नांदेड आणि परभणी तसंच कर्नाटकातल्या चिक्कबल्लारपूर आणि बेंगळुरू मतदारसंघांमध्ये सभा घेतल्या. मोदी यांनी नांदेडमधल्या सभेत बोलताना, निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या मतदानाबाबत समाधान व्यक्त केलं, तसंच मतदानाचं प्रमाण वाढवत नेण्याचं आवाहनही केलं.

<><><><><>

सर्वसामान्यांसह महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेणारा सक्षम पक्ष म्हणून भाजपानं गेल्या दहा वर्षात कामगिरी केली आहे, असं प्रतिपादन भाजापा अध्यक्ष जेपी नड्डा यांनी केलं आहे. ते आज बुलढाणा जिल्ह्यात संग्रामपूर तालुक्यात वरवट बकाल इथं महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव यांच्या प्रचारसभेत बोलत होते.

आज आपण ५ वी मोठी अर्थव्यवस्था बनलो आहोत आणि आता लवकरच जगातली तिसरी मोठी अर्थव्यवस्था व्हयचं असेल, २०४७ पर्यंत विकसित भारत बनवायचा असेल तर भाजपा पुन्हा सत्तेत यायला हवी. असं ते म्हणाले.

<><><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रचारगीतातून हिंदू धर्म आणि जय भवानी हे शब्द वगळण्याची सूचना केंद्रीय निवडणूक आयोगानं केली आहे. मात्र, प्रचारगीतातून हे शब्द वगळणार नाही, यासाठीचा न्यायालयीन लढा आम्ही लढू असं अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी आज मातोश्री निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत सांगितलं.

<><><><><>

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण रायगड लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दोन सामने होणार आहेत. पहिला सामना कोलकाता इथल्या इडन गार्डन्स मैदानावर दुपारी साडे तीन वाजता रॉयल चॅलेंजर्स बेंगलुरू आणि कोलकाता नाइटराइडर्स यांच्यात होणार आहे. तर दुसरा सामना चंडीगढ इथं पंजाब किंग्ज आणि गुजरात टायटन्स यांच्यात संध्याकाळी साडे सात

वाजता होणार आहे. काल झालेल्या सामन्यात सनराईजर्स हैदराबादनं दिल्ली कॅपिटल्सला ६७ धावांनी हरवलं.

<><><><><>

ईपीएफओ अर्थात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेची सदस्यसंख्या गेल्या फेब्रुवारीत १५ लाख ४८ हजार झाली आहे. ईपीएफओने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीत म्हटलंय की, आकडेवारीनुसार फेब्रुवारी २०२४ मध्ये सुमारे ७ लाख ७८ हजार नव्या सदस्यांची नोंदणी झाली असून यामध्ये युवा आणि प्रामुख्यानं प्रथमच नोकरी प्राप्त करणाऱ्या सदस्यांची संख्या अधिक आहे. नव्याने भर पडलेल्या सदस्यांमध्ये १८ ते २५ वयोगटातल्या सदस्यांचा वाटा ५६ पूर्णांक ३६ शतांश टक्के आहे. नव्या सदस्यांपैकी सुमारे २ लाख ५ हजार महिला आहेत.

<><><><><>

NTA अर्थात, राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं विद्यापीठ अनुदान आयोगाच्या NET अर्थात, राष्ट्रीय पात्रता चाचणी, २०२४ साठीची नोंदणी प्रक्रिया सुरू केली आहे. इच्छुक उमेदवार अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या लिंकद्वारे राष्ट्रीय पात्रता परीक्षेसाठी अर्ज करू शकतात. १० मे पर्यंत नोंदणी प्रक्रिया सुरू राहणार आहे.

<><><><><>

आज नागरी सेवा दिन आहे. यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी सर्व सनदी अधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

//<><><><><>//